

# गुढी पाडवा

गुढीपाडवा हा हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहुर्तांपैकी हा एक मुहुर्त आहे.

या दिवशी महाराष्ट्रात लोक घराच्या प्रवेशद्वारी उंचावर गुढी उभारतात. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा दिवस कर्नाटक आणि आंध्रप्रदेश अशा इतर भारतीय प्रांतात चेटी चांद उगादी अशा वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो.

रामायण, महाभारत व इतर पुराणात अथवा पौराणिक नाटकात इंद्रध्वजाचा उल्लेख आढळतो. श्रीरामाने रावणावर विजय मिळवून याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला अयोध्येत पुन्हा प्रवेश केला त्या दिवशी मंगल तोरणे बांधुन उंच गुढी उभारुन लोकांनी आनंदोत्सव साजरा केला.

इ. स. १२७८ मध्ये महानुभाव पंथातील म्हाईंभटांनी रचलेल्या 'लिळाचरित्र' या ग्रंथात गुढीचा उल्लेख आढळतो. पुढे संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरीत अध्याय ४, ६ व १४ मध्ये गुढीचा उल्लेख आलेला आहे.

'अधर्माची अवधी तोडी। दोषांची लिहिली फाडी ॥<br>
सज्जना करवी गुढी। सुखाची उभवी ॥<br>
माझी अवसरी ते फेडी। विजयाची सांगे गुढी।<br>
येरु जीवी म्हणे सांडी। गोठी यिया ॥

संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखामेळा या सर्वांच्या लेखनात गुढीचे उल्लेख येतात. संत चोखोबा म्हणतात,

टाळी वाजवावी, गुढी उभारावी। वाट हे चालावी।<br>
पंढरीची ॥

संत एकनाथांच्या लेखनात गुढी रुपांगणी वापरली जात असल्याचा उल्लेख आहे.

पुढे पाठविले गोविंदे गोपाळ। देऊनि चपळ। हाती गुढी ॥

असा संत तुकाराम महाराजांच्या अभंगात उल्लेख आहे.

daram FOR EDUCATIONAL USE

गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे लवकर उठून शुचिर्भूत होऊन सुर्योदयानंतर गुढी उभारतात. उंच काठीच्या वरच्या टोकाला रेशमीवस्त्र, कडूलिंब व आंब्याची डहाळी, फुलांचा हार, साखरेची गाठी बांधून त्यावर पितळेचा, तांब्याचा किंवा चांदीचा तांब्या बसवितात. गुढीची गंध पुष्प अक्षता फुले वाहून पुजा केली जाते. गोडाचा नैवेद्य दाखवितात सायंकाळी पुन्हा पुजा करुन गुढी उतरविली जाते.

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मते गुढीपाडवा हा भूमीच्या सर्जनशीलतेची भक्तीने पुजा करण्याचा सण आहे. गुढी किंवा ब्रम्हध्वज हे विजयाचे, आनंदाचे प्रतिक आहे. प्रातःकाळी ओवा, मीठ, हिंग, मिरी व साखर कडूलिंबाच्या पानासोबत किंवा फुलांसोबत वाटून खातात.

ब्रम्हदेवाने याच दिवशी हे विश्व निर्माण केले. याच दिवशी चौदा वर्षे वनवास भोगून लंकाधिपती रावणाचा वध करून श्रीरामाने अयोध्येत प्रवेश केला. शालिवाहन राजाने सहा हजार मातीचे पुतळे तयार करुन सैनिक तयार केले त्यात प्राण ओतला व आपला शत्रू शकांचा पराभव केला. या शालिवाहन राजाच्या नावाने शालिवाहन शक ही कालगणना सुरु झाली. वर्षाचा आरंभ होतो म्हणून पंचांगाची पुजा केली जाते. या तिथीला सर्व उत्पात, सर्व पापे, व कलीकृत दुःस्वप्ने यांचा नाश होतो. या दिवशी नवे संकल्प, नविन उद्योग नव्या धडाडीने प्रारंभ केले जातात.

यावेळी

संवत्सरोऽसि, परिवत्सरोऽसि इडावत्सरोसि अनुवत्सरोसि,
वत्सरोऽसि ॥ हा मंत्र म्हणावा आणि
भगवंस्त्वत्प्रसादेन वर्षं क्षेममिहास्तु मे । संवत्सरोपसर्गा मे
विलयं यान्त्वशेषतः

अशी प्रार्थना करावी. हे भगवन् तुझ्या कृपेने माझे वर्ष सुखाचे जावो आणि वर्षातील सर्व आपत्ती समूळ नष्ट होवोत असा या प्रार्थनेचा अर्थ आहे.

नूतन वर्ष आपणा सर्वांना सुख समृद्धी, आरोग्य देणारे जावो हीशुभेच्छा

FOR EDUCATIONAL USE

शोभा पांडे
गुरुगणेशनगर, पुणे